**दिव्य मराठी विशेष** • के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे टीसीएस कंपनीच्या सहकार्याने राबविला उपक्रम

# 'कॅम्पस टू कॉर्पोरेट'मधून कौशल्य विकासाचे धडे



**प्रतिनिधी** | नाशिक

विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच व्यवसाय कौशल्याचे धडे मिळावेत या उद्देशाने के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे टीसीएस कंपनीच्या सहकार्याने 'कॅम्पस टू कॉर्पोरेट' या उपक्रम राबविण्यात आला. एक महिना विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना प्रमाणपत्रही वितरित करण्यात आले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या चार वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये टीसीएस या नामांकित आयटी कंपनीतर्फे 'कॅम्पस टू कॉर्पोरेट' हा उपक्रम राबविण्यात आला. एक महिनाभर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर यात सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी टीसीएस कंपनीच्या नाशिक विभागाच्या एचआर हेड पलक जहान, सायमन, रवि, निधी किशोरी, संस्थेचे समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, उच्च शिक्षण समन्वयक डॉ. बी. जी. वाघ, प्राचार्य डॉ. ए. पी. राजपूत, प्रा. अर्चना बेंडाळे आदी उपस्थित होते. टीसीएसमध्ये होणाऱ्या भरतीविषयी यावेळी सायमन यांनी मार्गदर्शन केले. तर जहान यांनी विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्त करण्याचे आवाहन केले. प्रा. दीप्ती तांदळे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. कोमल शिंदे यांनी या प्रास्ताविक केले. प्रा. पवन मालानी यांनी आभार मानले.

**दिव्य मराठी विशेष** • कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हला शहरातील विविध महाविद्यालयांचा लाभला प्रतिसाद

# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी

प्रतिनिधी | नाशिक



कौशल्य प्राप्त करून देणाऱ्या तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या चांगल्या संधी मिळत आहे. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेल्या विविध कंपन्यांच्या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये संस्थेच्या महाविद्यालयांसह शहरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांना वार्षिक तीन लाखांपासून ते सात ते आठ लाखांपर्यंतच्या पॅकेजेसची ऑफरच्या प्लेसमेंट मिळाल्या आहेत.

के. के. वाघ अभियांत्रिकीतील ६६ विद्यार्थ्यांना वेतनमानासहित इंटर्नशिपदेखील देण्यात आली आहे. सर्वप्रकारच्या उद्योग क्षेत्रांतील कंपन्यांनी विविध पदांकरिता विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या आहे. त्यात ऑनलाइन टेस्ट, ग्रुप डिस्कशन, टेक्निकल इंटरव्ह्यू, पर्सनल इंटरव्ह्यू अशा विविध फेऱ्यांमधून विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यामध्ये इंडियन नेव्ही, टीसीएस, एरेस, केपीआयटी, फिनिक्स, महिंद्रा अॅण्ड महिंद्रा, महिंद्रा सोना, बॉश, कल्पतरू ग्रुप, इन्फोसिस, क्राम्प्टन ग्रीव्हज, विनजित टेक्नोलॉजी, व्हीआयपी यांसारख्या अनेक उद्योग समूहांनी यात सहभाग घेतला होता. या कंपन्यांकडून १३१ विद्यार्थ्यांना तीन ते सात लाखांपर्यंतच्या पॅकेजेसची ऑफर मिळाली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांना तीन लाखांपर्यंतच्या पॅकेजची ऑफर मिळाली आहे. सहा विद्यार्थ्यांना दहा लाखांपर्यंतची ऑफरच्या पॅकेजेस मिळाले आहेत. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. यासाठी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# के. के. वाघच्या ३४ विद्यार्थ्यांना संधी



म. टा. प्रतिनिधी, नाशिक

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेज कॅम्पसमध्ये आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ३४ विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. हिंद रेक्टिफायर्स, विप्रो, पर्सिस्टन्ट सिस्टीम्स, कंपनीकडून या कॅम्पसमध्ये या मुलाखती पार पडल्या.

केमिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कम्प्युटर, आयटीए आणि प्रॉडक्शन इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. कंपनीकडून आलेल्या मान्यवरांचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी स्वागत केले.

सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होता आले. या सर्व कंपनीच्या मुलाखतीमध्ये ऑनलाइन टेस्ट, त्यानंतर टेकनिकल टेस्टनंतर वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली.

या मुलाखतींमध्ये यशस्वी ३४ विद्यार्थ्यांना ४.४ लाख आणि सरासरी ३.५० लाखांचे पॅकेज देण्यात आले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये शाखानिहाय कम्प्युटर शाखेतील १६, आयटी क्षेत्रातील ८, मेकॅनिकल शाखेतील २, इलेक्ट्रॉनिक्स मधील १ प्रॉडक्शनमधील १, केमिकलमधील १ याप्रमाणे विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये १८ मुले व १६ मुलींची समावेश आहे, अशी माहिती ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. कॉलेजतर्फे विद्यार्थ्यांनाना प्रशिक्षण, मॉक इंटरव्ह्यू, ॲप्टिट्यूड ट्रेनिंग देण्यात आल्याची माहिती कॉलेजच्या वतीने देण्यात आली.

# इंजिनिअरिंगच्या ६० विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी

प्रतिनिधी । नाशिक



विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी या उद्देशाने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कॅम्पस प्लेसमेंटद्वारे ५६ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांत नोकरीच्या संधी मिळाल्या आहे. तसेच मशिनच्या अभियांत्रिकीतील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांनाही प्लेसमेंट मिळाली आहे. वार्षिक दोन ते चार लाखांपर्यंतच्या पॅकेजची प्लेसमेंट विद्यार्थ्यांना मिळाल्या आहे.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व कॉम्प्युटर शाखेच्या ५६ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, बॉश, महिंद्रा सोना, महिंद्रा अँण्ड महिंद्रा, टीसीएस, व्हीआयपी, मोट्रन, आर. आर. प्लास्टो एक्सट्रुजन, के.एस.बी. पंप यांसारख्या नामांकित कंपन्यांत विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना चार लाखांपर्यंतच्या वार्षिक पॅकेजच्या ऑफर मिळाल्या आहे. विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव के. एस. बंगी, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर, विभागप्रमुख एस. एस. साने, बी. इ. कुशारे, पी. जे. पवार, एस. बी. मुरगकर यांचे मार्गदर्शन लाभले.